# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com


जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. ३१.०५.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश दि. १५.०४.२०२०, दिनांक १९.४.२०२० सुधारीत आदेश दिनांक २०.४.२०२०, दि.२१.०४.२०२०, दि.२३.०४.२०२० आदेश दिनांक ३.५.२०२०, दिनांक १७.०५.२०२०, दिनांक १९.०५.२०२०, दि.२१.०५.२०२० व विस्तारित आदेश दिनांक २२.०५.२०२०.

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्रं. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि.०२.०५. २०२०, ०३.०५.२०२०, ०५.०५.२०२०, १५.५.२०२०, १७.०५.२०२०, १९.०५.२०२० व दि.३१.०५.२०२०

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना च्या अनूषंगाने नांदेड जिल्हयात दिनांक ०१.०६.२०२० पासून पुढील आदेशा पावेतो फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू करणे बाबत.

**आदेश**

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०१ वरील विस्तारीत आदेश दिनांक २२/५/२०२० अन्वये जिल्हयात जमावबंदी आदेश, नियमावलीसह पुढील आदेशा पर्यंत नांदेड जिल्हयात नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात संदर्भ क्र.०१ वर नमूद या कार्यालयाचे इतर आदेशातील अटी व शर्ती जशास तसे पुढील आदेशा पर्यंत लागू राहतील असे आदेशीत करण्यात आले आहे.

आणि त्याअर्थी संदर्भ क्रमांक ०३ वरील आदेश दिनांक ३१.०५.२०२० नुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक, ३० जुन २०२० पर्यंत नियम व अटीच्या अधिन राहून ताळेबंदीचा कालावधी वाढवून मार्गदर्शक सुचना, निर्देश निर्गमित केले आहे.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर,(भा.प्र.से). जिल्हादंडाधिकारी नांदेड,फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये संपूर्ण नांदेड जिल्हयात खालील प्रमाणे मनाई आदेश पारित करीत आहे.

- नांदेड जिल्हयातील टाळेबंदीच्या कालावधीत **सायंकाळी ०९.०० ते सकाळी ०५.०० वाजेपावेतो संचारबंदी लागु राहील.** कोणीही विनाकारण बाहेर फिरु नये. मात्र यामधून अत्यावश्यक सेवेकरिता नेमण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी व वैद्यकिय कारणास्तव रुग्ण व त्याच्यासोबत असलेले नातेवाईक यांना मुभा राहील. सदर वेळेत विनाकारण फिरतांना आढळल्यास अशा व्यक्तींच्या विरोधात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
- या कार्यालयाचे संदर्भीय विस्तारीत आदेश दिनांक २२.०५.२०२० मधील परिशिष्ट - २ मध्ये अ.क्र.५ नूसार अंत्यविधीमध्ये ५० नागरीकांना पर्यंत सहभागाची दिलेली मुभा कमी करुन **त्याऐवजी २० नागरीकांपेक्षा जास्त नागरीकांना सहभागी होता येणार नाही.**
- या कार्यालयाचे संदर्भीय विस्तारीत आदेश दिनांक २२.०५.२०२० मधील परिशिष्ट - ३ मध्ये नमुद **केशकर्तनालय दुकाने, स्पा, सलुन, ब्युटी पार्लर चालू ठेवण्यासाठी दिलेली मुभा याव्दारे रद्द करण्यात येत आहे.** अशी दुकाने चालू ठेवता येणार नाहीत
- नांदेड जिल्हा नॉन रेड झोन मध्ये असल्याने यापूर्वी या कार्यालयाकडून दुकाने व आस्थापना व ईतर परवानगी दिलेल्या बाबी प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) वगळून उर्वरित क्षेत्राकरिता नियम व अटीच्या अधीन **सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत** यापुढेही चालू राहतील.

D PC CORONA

Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र अरालेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणा-यां विरुध्द कठोर कारवाई करावी. तसेच वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्हेतुने केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवर विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

हे आदेश दि. ३१.०५.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

(डॉ.विपीन इटनकर) भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यकत्या कार्यवाहीस्तव**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधिक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
१०. जिल्हा माहीती अधिकारी, नांदेड

जिल्हादंडाधिकारी नांदेड

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

D PC CORONA

Scanned with CamScanner